# दि युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप.क्रेडिट सोसायटी मर्यादित, मुंबई

*(नोंदणी क्र.बी ओ एम/आर एस आर/३५४/३.६.६७)*

युनियन बँक बिल्डिंग, ४ था मजला, रुम नं.१९, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दूरध्वनी क्र.२२६७७७१८, २२६७४१३८ ईमेल ubicrsoc@gmail.com web site : unionbankcreditsociety.com


## ५३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

## (फक्त सभासदांसाठी)

दि युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप.क्रेडिट सोसायटी मर्यादित या संस्थेची सन २०२०-२१ या वर्षाची ५३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ रोजी सायं ठीक ५:०० वाजता **व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे (VC)** घेण्यात येणार आहे. कृपया सर्व सभासदांनी सदर सभेत व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सहभागी व्हावे ही नम्र विनंती. सदर सभेपुढील विषयसुची पुढीलप्रमाणे आहे.

## सभेपुढील विषय सुची

१. दिनांक २२ मार्च, २०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. ५३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित सभासदांची गैरहजेरी क्षमापित करणे.
३. सन २०२०-२०२१ या वर्षाच्या मान्य अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
४. सन २०२०-२०२१ या वर्षाचा अहवाल, हिशोबाचीपत्रके स्विकृत करणे.
५. सन २०२०-२०२१ या वर्षासाठी मा.संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मान्यता देणे.
६. सन २०२०-२०२१ या वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची व त्यावर कार्यालयाने केलेल्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
७. सन २०२१-२२ वर्षाकरीता वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे.
८. सन २०२१-२२ या वर्षाकरीता अंतर्गत व कर लेखा-परिक्षकांची नेमणूक करणे व मानधन ठरविणे.
९. सन २०२१-२२ या वर्षाच्या मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
१०. मृत सभासद कल्याणकारी योजना व जामीन हमी योजनेमध्ये बदल करण्यास मान्यता देणे.
११. उपविधी क्र. फ.१.१० मध्ये दुरुस्तीस मान्यता देणे.
११. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणा-या विषयांवर विचार करणे.

व्यवस्थापक समितीच्या आदेशावरुन,

**(प्रशांत सुर्वे)**
मानद् सचिव

मुंबई
दिनांक : ०२/०८/२०२१

---

**सूचना :**

१. सदर सभा व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात येणार आहे याची नोंद सभासदांनी घ्यावी.
२. ही सभा गणसंख्येअभावी तहकूब झाल्यास सदरची सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल व त्या सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
३. वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषयासंबंधी काही प्रश्न अगर सूचना असल्यास त्या दि.२३/०८/२०२१ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात आणून देणे.
४. संस्थेचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक संस्थेच्या मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत सभासदांना पाहण्यास उपलब्ध आहे. तसेच संस्थेच्या वेबसाईट वर उपलब्ध आहे.
५. उपविधी क्र. घ.१.३ (४) अनुसार लाभांश जाहीर झालेल्या तारखेपासून तीन वर्षाच्या मुदतीत जर स्विकारला नसेल तर तो संस्थेच्या राखीव निधीत जमा करण्यात येईल. सभासदांनी २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० सालातील लाभांश अद्याप घेतला नसेल त्यांनी तो स्विकारावा.